# समाज भूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे २

**सत्रांत परिक्षा २०१७–२०१८**

**विषय – मराठी विशेषस्तर अभ्यासपत्रिका २ (एस २) अर्वाचिन मराठी वाङ्मयाचा इतिहास १८०० ते १९६०**

**वेळ - २ तास**

**द्वितीय वर्ष , कला** **गुण – ६०**

---

**सूचना –** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. २) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालीलपैकी दहा प्रश्नांची उत्तरे २० शब्दांत लिहा.** **२०**

१. मराठीतील पहिले मुद्रित पुस्तक कोणते ?
२. पहिले वृत्तपत्र कोणी सुरू केले ? कोणते ?
३. मुंबई विद्यापीठाची स्थापना केव्हा झाली ?
४. मराठीतील वाङ्मयसेवा करणाऱ्या दोन मासिकांची नावे लिहा.
५. 'मराठी भाषेचे पाणिनी' कोणास संबोधले आहे ?
६. 'शतपत्रे' कर्ते कोण त्यांचे पूर्ण नाव लिहा.
७. आधुनिक काव्याचे जनक कोणास म्हटले आहे ?
८. ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्यांची दोन नावे लिहा.
९. 'संगित शारदा' या नाटकाचे लेखक कोण ?
१०. अर्वाचीन कालखंडातील (१८७५ ते १९२०) दोन कथाकारांची नावे लिहा.
११. बालकवींच्या दोन निसर्गकवितांची नावे लिहा.
१२. 'बाळकराम' या टोपण नावाने विनोदी लेखन करणारे लेखक कोण ?
१३. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या गाजलेल्या नाटकांची दोन नावे लिहा.

**प्र.२ खालीलपैकी तीन प्रश्नांची उत्तरे ५० शब्दांत लिहा.** **१५**

१. १८०० ते १८७४ या कालखंडातील वृत्तपत्रांचे स्वरूप सांगा.
२. निबंधमाला'चे कार्य थोडक्यात स्पष्ट करा.
३. १८०० ते १८७४ या कालखंडातील भाषांतरीत नाटकाचे स्वरूप
४. अर्वाचीन कालखंडातील मराठी काव्यलेखनाच्या प्रेरणा व वैशिष्ट्ये लिहा.
५. १८७५ ते १९२० या कालखंडातील मराठी कथावाङ्मयाचे स्वरूप.

**प्र.३ खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे ५० शब्दांत लिहा.** **१०**

१. अव्वल इंग्रजी कालातील नियतकालिकांचे कार्य.
२. कवी केशवसुतांच्या काव्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये लिहा.
३. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचा नाट्यसंसार.
४. १८७५ ते १९२० या कालखंडातील मराठी कथेची वाटचाल स्वरूप स्पष्ट करा.

**प्र.४ खालीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर ३०० शब्दांत लिहा.** **१५**

१. ''१८१८ ते १८७५ या कालखंडास भाषांतर युग म्हणतात'' सोदाहरण स्पष्ट करा.
२. १८८५ ते १९२० या कालखंडास 'नाटकाचे सुवर्ण युग' का म्हटले आहे. सविस्तर स्पष्ट करा.

OOO